## माहे एप्रिल 2025 सभा दिनांक 29.04.2025 च्या संचालक मंडळ सभेत खालील प्रमाणे लॉकर पॉलिसीचा आढावा घेण्यात आला.

**विषय क्र. 22. लॉकर पॉलिसी आढावा घेणे.**

**ठराव क्र. 22. सन 2025-26 साठी खालीलप्रमाणे लॉकर पॉलिसीचा आढावा घेण्यात आला.**

# लॉकर / सेफ डिपॉझिट लॉकर पॉलिसी

दिनांक 18.04.2021 मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या DOR.LEG.REC/40/09.07 005/2021-22 प्रसिध्दी केलेल्या सुचनांना अनुसरून दि पिंपळगाव मर्चटस को-ऑप लि., बँकेची लॉकर व सेफ डिपॉझिट लॉकरबाबत पॉलिसी खालील प्रमाणे करण्यात येत आहे सदर उपरोक्त परिपत्रकानुसार 1 जानेवारी 2022 पासुन अंमलात आणणे बाबत सुचित केले आहे.

- **लॉकर धारकाची अर्हता (Customer Due Diligence For Locker)**

  बँकेत असलेल्या व या आधीच लॉकर धारक असलेल्या खातेदार व ज्यांनी आपला ग्राहक ओळखा दिशानिर्देश 2016 (वेळोवेळी यात सुचविलेल्या बदलानुसार) यांनी यास अनुसरून पुर्तता करणे आवश्यक आहे. बँकेने लॉकर अॅग्रीमेंट करतांना ज्या ग्राहकास इतर सेवा पुरविण्यात आलेल्या आहेत व ज्यांना लॉकर सुविधा देण्यात आलेली आहे त्या ग्राहकांने लॉकर / सेफ डिपॉझिट लॉकर मध्ये बेकायदेशीर धोकादायक गोष्टी ठेवण्यात येऊ नये याबाबत बँकेस संशय आल्यास सदर लॉकर धारकांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार बँकेला असेल बँक ग्राहकांचा अलीकडील पासपोर्ट साईज फोटोग्राफ व इतर कागदपत्रे हे सर्व रेकॉर्ड बँकेमार्फत जतन (Preserve) केले जाईल.

- **लॉकर अदायगी (Locker Alotment)**

  बँक या बाबत शाखानिहाय लॉकरधारक संदर्भात आलेल्या अर्जाबाबत प्रतिक्षा यादी CBS (Core Banking System) तयार करून ठेवण्यात येईल व लॉकर देणे बाबत पारदर्शकता ठेवण्यात येईल अर्ज आल्यानंतर त्यांची पोहच (स्थळप्रत) अर्जदारास देण्यात येईल व प्रतिक्षा यादी क्रमांक वाटपासाठी उपलब्ध नसल्यास ग्राहकांना देण्यात येईल.

- **सेफ डिपॉझिट लॉकर करारनामा**

  बँक बोर्ड ऑफ Director यांचे कडुन लॉकर करारनामा मंजुर केलेला करार असेल या हेतुने बँका (IBA) व्दारे तयार केलेल्या मॉडेल कराराचा अवलंब करतील या करारामध्ये सुधारी सुचना आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या पालना संदर्भात बँकांनी हे सुनिच्चित केले पाहिजे की कोणत्याही अनुचित अटी व शर्ती समाविष्ट केल्या जाणार नाही बँकेच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सामान्य

HEAD OFFICE The Pimpalgaon Merchant's Co-op. Bank Ltd.

व्यवसायात बँका त्यांचे नुतनीकरण करतील तसेच 1 जानेवारी 2023 पावेतो सदर करारनामा व कागदपत्रे तयार करून घेण्यात येईल.

- **लॉकर भाडे (Locker Rent)**

काही लॉकर धारक लॉकर भाडे वेळेवर भरत नाही सदर भाडे त्वरित व्हावे या दृष्टीने लॉकर देतेवेळी लॉकर भाडे वसुलहोईल इतपत लॉकर डिपॉझिट / लॉकर ब्रेक ओपन करावे लागले तर त्यांचा होणारा खर्च इतके डिपॉझिट घेण्यात येईल मात्र जे खातेदार (यापुर्वीचे) नियमित लॉकर भाडे भरत आहे किंवा त्यांचे व्यवहार नियमित आहे त्यांना लॉकर डिपॉझिट देणे बाबत आग्रह करण्यात येणार नाही. जर लॉकर भाडे आगाऊ घेण्यात आले असेल व लॉकर धारकाने दरम्यानच्या काळात सदर लॉकर बंद करत असेल तर आगाऊ घेतलेले भाडे प्रो रेटा पध्दतीने परत करण्यात येईल बँकेच्या शाखांचे विलीनिकरण / बंद स्थलातंर यासाठी कोणतीही घटना असल्यास बँक वर्तमान पत्रात ज्यात 1 स्थानिक भाषेतील वर्तमानपत्रात याबाबत जाहिर करेल व लॉकर धारकांना किमान 2 महिने आधी याबाबत सुचित करेल काही नैसर्गिक आपत्तीमुळे या आणीबाणीच्या परिस्थितीत बँक सर्व मार्गाचा अवलंब करून ग्राहकाला प्रयत्न करेल व कळविण्यात येईल.

- **स्ट्रॉगरूम / व्हॉल्ट सुरक्षा बाबत**

बँके मार्फत सदर स्ट्रॉगरूम / व्हॉल्ट जेथे लॉकर ठेवण्यात आलेली आहेत याबाबत खालील प्रमाणे काळजी घेईल.

अ) बँक घरफोडी (House Breaking) होणार नाही या दृष्टीने सर्व काळजी घ्यावी.

ब) पाऊस / पुर परिस्थितीत लॉकरचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

क)आगी संदर्भात आग प्रतिबंधक सर्व उपाय करण्यात येतील व वरील सर्व बाबी बाबत वेळोवेळी Verification करण्यात येईल.

ड) लॉकर ऑपरेटिंग करीत आगम निर्गमव्दार हे एकच असेल.

- **लॉकर वापर (Locker Operation)**

लॉकर धारकाने एखाद्या व्यक्तीस / नातेवाईकास तिच्या / त्यांच्या वतीने लॉकर Operate करणे बाबत अधिकार दिले असतील तर असे अधिकाराची कागदपत्रे पुर्तता करून घेऊन त्यांचे योग्य ते रेकॉर्डिंग तयार करून (बँक मॅनेजमेंट) तशी परवानगी देतील लॉकर कधी ऑपरेट केले त्यांची तारीख वेळ लॉकर उघडले बंद केले याबाबत वेळ व सही घेण्यात येईल व त्यांचे रेकॉर्ड ठेवण्यात येईल बँकेच्या रेकॉर्डवर असलेल्या मोबाईला नंबर / इ-मेल आयडी वर सदर कार्यालयीन वेळ संपण्यापुर्वी लॉकर ऑपरेट झाले बाबत तारीख, वेळ कळविण्यात येइल कि या तारखेस व वेळेस लॉकर उघडण्यात / बंद करण्यात आलेले आहे (Operate) करण्यात आले आहे.

- **अंतर्गत नियंत्रण**

जर लॉकर धारकाने लॉकर बंद केले / सरेंडर केले अशावेळी बँक सदर लॉकरचे लॉक चेंज करेल रिकाम्या झालेल्या लॉकरची किल्ली (Key) बंद लिफाफ्यात ठेवण्यात येईल. बँकेमार्फत अचानक चेकींग करून सरेडंर / रिकामे लॉकर बाबत त्यांच्या चाव्या बँक ऑफिसरकडुन त्यांची खातरजमा

HEAD OFFICE

करण्यात येईल व त्यांचे रेकॉर्ड व्हेरिफिकेशन केलेबाबत रेकॉर्ड ठेवले जाईल. बँक लॉकर रजिस्टर व लॉकर की रजिस्टर हे CBS प्रणालीत / (System Maintain) करण्यात येईल लॉकर रजिस्टर Update ठेवले जाईल ऑडिटचे वेळी काही बदल करावयाचे असल्यास त्यांचा उपयोग होईल.

लॉकर ऑपरेट झालेनंतर सदर लॉकर निट बंद झाले अथवा नाही याची खातरजमा करण्यात येईल जर लॉकर बंद व्यवस्थित केले नसल्यासबाबत आढल्यास त्वरीत संबधित लॉकर धारकास मोबाईल वरून / ई-मेलवर कळविण्यात येईल याबाबत दिनांक वेळ याचे रेकॉर्ड ठरवले जाईल. लॉकर बँक कस्टोडिअन बॅकिंग Hours संपण्यापुर्वी लॉकर रूम मध्ये सर्व लॉकर व्यवस्थित बंद करण्यात आलेली आहेत याची खातरजमा करेल त्यानंतर कोणीही लॉकर धारकास व्यक्तीस बॅकिंग Hours नंतर प्रवेश देण्यात येणार नाही.

- **नामांकन सुविधा व क्लेम सेटलमेंट**

बँक नामांकन सुविधा लॉकर धारकांना व सेफ कस्टडी आर्टिकल धारकांना SEC 45 ZC to 45 ZF बॅकिंग रेग्युलेशन अॅक्ट 1949 बँकिंग कंपनीएज (Nomination) Rule 1985/Co-operative Banks (नॉमिनेशन) नियम 1985 नुसार देण्यात येईल. जर नामांकन Minor चे नावाने असेल त्याबाबत खालील प्रमाणे कारवाई करेल. पासपोर्ट साइज फोटोग्राफ Attested ग्राहकांकडुन घेऊन इतर कागदपत्रे घेऊन तिचे / त्यांचे रेकॉर्ड जतन केले जाईल.

जर लॉकर धारक व्यक्ती निरक्षर असेल तर त्यांचा अंगठा दोन विटनेस खातेदार साक्षीदार समोर घेण्यात येईल इतरांचे बाबतीत अशी आवश्यकता असणार नाही. बँक नामांकन बाबतीत प्रोसिजर प्रमाणे नामांकन रजिस्टर ठेवेल कॅन्सलेशन किंवा नामांकनात बदल अशा बाबीची नोंद पुस्तकात केली जाईल बँक नामांकन सिस्टिम प्रमाणे नामांकन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर रिसिट दिली जाईल सदर रिसिट ग्राहकाने मागणी केली असली नसली तरी दिली जाईल.

- **मयत झालेल्या लॉकर धारकाचे बाबतीत सेटलमेंट प्रोसेस**

बँक सेटलमेंट ऑफ डेथक्लेम पॉलिसी बोर्ड कडुन मंजुर करून घेईल सदर पॉलिसी वेळोवेळी नियमाकामार्फत दिलेल्या सुचनेनुसार आणि IBA ने निर्गमित केलेल्या नियमा नुसार केले जातील. सदर पॉलिसी बोर्ड कडुन मंजुर केलेली असेल Nomination Provision Sec 45 Zc To 45 Zf बँकिंग रेग्युलेशन ACT 1949 नुसार आणि इंडियन कॉन्ट्रॅक्ट ऍक्ट तसेच इंडियन Succession अॅक्ट नुसार संरक्षण मिळेल. बँक मयत लॉकर धारकाचे बाबतीत लॉकर नामांकन केलेल्या व्यक्तीस मयत दाखला इतर सर्व लागु असलेले कायदे व Guideline नुसार देण्यात येईल.

मयत लॉकरधारकांचे वारसा कडुन अर्ज आल्या नंतर जास्तीत जास्त 15 दिवसांचे आत क्लेम सेटल केला जाईल मयत दाखला (Death Certificate) क्लेम करणाऱ्या अर्जदारांची प्रॉपर ओळख व बँकेचे समाधान झाल्यावर करण्यात येईल.

- **लॉकर बंद आणि Discharge ऑफ लॉकर आयटम**

खालील बाबतीत लॉकर ब्रेक ओपन केले जाईल.

अ) जर भाड्याने घेणाऱ्याने चावी गमावली आणि लॉकर उघडण्याची विनंती / तिला / त्यांच्या खर्चाने केली.

HEAD OFFICE The Pimpalgaon Merchant's Co-op. Bank Ltd.

ब)जर सरकारी अंमलबजावणी एजन्सीनी कडुन आदेश घेवुन बँकेशी संपर्क साधला असेल, लॉकर जप्त करण्यासाठी न्यायालय किंवा योग्य सक्षम प्राधीकारी आणि प्रवेशासाठी विनंती केली.

क)लॉकर भाड्याने घेणारा नसल्यामुळे लॉकर परत घेण्याची गरज असल्याची बँकेचे मत असल्यास सहकार्य करणे व कराराच्या अटी व शर्तीचे पालन न करणे.

- **रिकव्हरी करीता अटॅचमेंट ऑफ लॉकर कायदेशीर दृष्ट्या कारवाई**

एखादी वसुली करीता अॅटचमेंट ऑर्डर आली सदर ऑर्डर कोर्टामार्फत किंवा गव्हर्नमेंट कॉम्पेटेन्ट अॅथोरीटीने दिलेली असेल तर बँक सदर ऑर्डरच्या सुचना अंमलात आणणे कामी सहकार्य करेल. बँक याबाबत ऑर्डरची सत्यता पडताळेल व समाधान झाल्यास त्यानंतर लॉकर धारकास मोबाईल ईमेल SMS व्दारा संपर्क करून गव्हर्नमेंट अॅथोरीटी अशा कारणा करीता बँकेत आलेली आहे त्या करीता आपण उपस्थित रहा व गव्हर्नमेंट ऑफिसर दोन साक्षीदारासह बँक ऑफिसर या कारवाई संदर्भात सह्या करतील लॉकर धारक उपस्थित असल्यास लॉकर मधील चीज वस्तु माहिती लिहिलेली प्रत्यक्ष दिली जाईल. बँक ब्रेक ओपन करणेच्या प्रोसेसचा व्हिडीओ व आतील चीजवस्तुचा कायदेशीर दृष्ट्या योग्य असेल तर काढेल व ते रेकॉर्ड जतन केले जाईल.

बँकेस पुर्ण अधिकार असेल जर ग्राहकाने / लॉकर धारकाने 3 वर्षाचे भाडे भरलेले नसेल त्यावेळी सदर लॉकर धारकास लॉकर रिकामे करणेबाबत सुचीत केले जाईल व भाडे वसुल करेल सदरचा नियम करारनाम्यात समाविस्ट करण्यात येईल. ब्रेक ओपन करणे पुर्वी बँकेमार्फत योग्य ती नोटीस लेटर ईमेल एसएमएस अलर्ट देईल जर पत्र / परत आले किंवा लॉकर धारकाचा तपास लागत नसेल तर बँक दोन वर्तमानपत्रात 1 इंग्रजी व 1 मराठी (व्हर्नाक्युलर) जाहिर नोटिस प्रसिध्दीस देईल त्यात ज्यांचे हितसंबध असतील त्यांनी योग्य वेळेत संपर्क करणे बाबत आवाहन केले जाईल या करिता सिनियर ऑफिसरची नेमणुक केली जाईल व सदर प्रोसेसचे / रेकॉर्ड / हे जतन (Preserve) केले जाईल भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास कोर्टात पुरावा म्हणुन सादर करेल.

- **लॉकर धारकाने लॉकर अनेक वर्षापासुन लॉकर ऑपरेट केले नसल्यास**

लॉकर 7 वर्षाच्या कालावधीसाठी निष्क्रीय राहिल्यास किंवा लॉकर धारकाचा तपास लागत नसेल परंतु लॉकर भाडे नियमित भरणा होत असेल तर अशा वेळी बँकेची जबाबदारी असेल कि सदर लॉकर नॉमिनेटेड केलेल्या व्यक्तीस किंवा त्यांचे कायदेशीर वारसाचे नावाने वर्ग करणे बाबत मात्र सदर लॉकर ब्रेक ओपन करणे किंवा उघडणे बाबतवर दर्शिवलेली प्रक्रिया अवलंबिण्यात येईल या संदर्भातील नियमाचा लॉकर करारनाम्यामध्ये समावेश केला जाईल. जर लॉकर दिर्घ कालावधी पर्यत लॉकर ऑपरेट केले नसेल तर किंवा बँकेमार्फत ओपन केले गेल्यास सर्व दायित्व पासुन बँक मुक्त असेल (Bank Discharge From Liability) कायदेशीर दृष्ट्या व मा. रिझर्व्हने सुचविलेल्या सुचनेनुसार त्याचा समावेश अॅग्रीमेंटमध्ये करण्यात यावा.

- **नुकसानभरपाई पॉलिसी / बँकेचे उत्तरदायीत्व Liability For bank**

या संदर्भात बोर्ड मार्फत पॉलिसी मंजुर करण्यात येईल त्यात जबाबदारी व उत्तरदायित्व काय असेल काही नुकसान किंवा दुर्लक्ष मुळे होऊ नये म्हणुन ड्युय डिलिजन्सचे पालन करेल Unauthorised Access लॉकर धारका व्यतिरिक्त दुसरे / कोणास देण्यात येणार नाही रॉबरी

घरफोडी यासारख्या प्रकार होऊ नये म्हणुन योग्य ती दक्षता बँकेमार्फत घेतली जाईल बँक यास उत्तरदायी नसेल (Liable) नुकसान हे नैसर्गिक आपत्तीमुळे (Act Of God) जसे कि भुकंप, पुर, विज कोसळणे वादळ किंवा स्वता लॉकर धारकाचे निष्काळजीपणामुळे नुकसान झाल्यास मात्र बँक या दृष्टीने सर्व ती काळजी घेईल. बँकेचे उत्तरदायीत्व सेवक वर्गाने फ्रॉड केला असेल तर बँकेची जबाबदारी असेल व या संदर्भात योग्य ती Enquairy करेल व सिध्द झाल्यास बँकेवर लॉकरच्या वार्षिक भाड्याच्या 100 पट इतकी जबाबदारी असेल.

- **जोखीम, पारदर्शकता व ग्राहकास अवगत करणे बाबत**

बँक बोर्डा कडुन विमा उतरविण्या संदर्भात मंजुरी घेईल यात कमीतकमी नुकसान, रोबरी, आग, नैसर्गिक आपत्ती यामुळे शाखा ट्रान्सफर यात कमीत कमी संबंधित लॉकरला होईल. बँक आपल्या करारनाम्यात स्पष्टपणे उल्लेख करेल कि बँक कोणत्याही प्रकारचे रेकॉर्ड हे लॉकर आर्टिकल किंवा चीज वस्तु बाबत ठेवण्यात येणं नाही. बँकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी नसेल कि ग्राहकाने काय ठेवले आहे त्यांचे नुकसान झाल्याबाबत बँक दर्शनी बोर्डावर लॉकर संदर्भातील मॉडेल लॉकर अॅग्रीमेंटटर्म कंडिशन लॉकर ऑपरेट पध्दत सदर माहिती बँकेच्या वेबसाइटला देखील असेल ग्राहकला लॉकर नियमाबाबत अवगत केले जाईल बँक लॉकर बाबत चार्जेस काय असतील ते बोर्ड वर Display केले जाईल व संबधीत लॉकर धारकाला या बाबीची 1 प्रत दिली जाईल.

# सेफ डिपॉझिट लॉकर्स भाड्याने देण्यासंबंधी नियम :-

1) सेफ डिपॉझिट लॉकर्स सामान्यत : बँकेचे सभासद, इतर व्यक्ति व संस्थाना भाड्याने देण्यात येतील. लॉकर्स भाड्याने देण्याचा किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार बँकेस राहील त्याची कारणे बँक बांधलेली राहणार नाही.
2) दुसरा व चौथा शनिवार व रविवार आणि बँकेच्या सुटीचा दिवस खेरीज इतर दिवशी दररोज लॉकर्सचे व्यवहार सकाळी 11 ते दुपारी 5 वाजेपर्यत होऊ शकतील.
3) बँक आणि लॉकर भाड्याने घेणार, यांचे परस्पर संबंध मालक आणि भाडेकरू असे राहतील. सेफ डिपॉझीट लॉकर्स खात्यांचा व्यवहार बँकेच्या इतर देवघेवीच्या व्यवहारापेक्षा स्वतंत्र असल्यामुळे बँक व बँकेचे खातेदार असे त्यांचे परस्पर संबंध राहणार नाहीत.
4) लॉकर्सचे भाडे ठरविण्याचा आणि त्यात वेळेवेळी बदल करण्याचा अधिकार बँकेस आहे परंतु असे बदललेले भाड्याचे दर चालु भाडेकरूच्या बाबतीत फेर मुदत वाढविणेचे वेळी अगर भाडेकरूने मुदतीअखेर लॉकर मोकळा करून न दिल्यास त्यावेळी लागु करण्यात येतील. लॉकरचे ठराविक मुदतीचे भाडे, बँकेस आगाऊ दिले पाहिजे.
5) अ) लॉकर भाड्याने मिळण्यासाठी अर्जाचा नमुना बँकेकडुन मिळेल, असा अर्ज ठराविक मुदतीचे भाडे आणि लॉकर भाड्याने देण्याचा करारनामा ठराविक नमुन्यात पुर्ण भरून दिल्यानंतरच लॉकर भाड्याने वापरण्यास मिळेल.

   ब) लॉकर एकाचे नावानेच मिळु शकेल. मात्र लॉकर भाड्याने घेणाऱ्यास स्वत:चे वतीने लॉकर उघडण्यासाठी व लॉकरचे इतर व्यवहारासाठी मुख्त्यार म्हणुन कोणासही नेमता येईल, परंतु अशा मुख्त्याराचे नाव समक्ष बँकेत येऊन अगर बँकेस पसंत पडेल अशा रितीने कळविले पाहिजे.

HEAD OFFICE

त्यासंबधीची नोंद बँकेच्या पुस्तकात झाल्यावरच सदर मुख्त्यारास लॉकरसंबंधीचे व्यवहार बँकेशी करता येतील.

6) लॉकर भाड्याने देण्याची किमान मुदत 3 महिने एवढे राहिल व पुढे वाढविण्याची मुदत त्याच प्रमाणात वाढविली जाईल. तुट मुदतीचा करार करण्यात येणार नाही.

7) भाड्याने घेतलेला लॉकर भाडेकऱ्यास इतर कोणास पोट - भाडेकरू म्हणुन देता येणार नाही अगर जोड - भाडेकरू स्विकारले जाणार नाहीत.

8) भाड्याने घेतलेल्या लॉकरमध्ये महत्वाचे कागदपत्र, दस्तऐवज मौल्यवान - वस्तु अशा प्रकारचे जिन्नस भाडेकऱ्यास ठेवता येतील, स्फोटक द्रव्ये अगर आरोग्य विघातक किंवा कोणत्याही प्रकारे धोका आणणारे जिन्नस लॉकरमध्ये ठेवता कामा नये. याबाबत बँकेचे अधिकाऱ्यांस संशय आल्यास व त्यांचे समाधानकारक रितीने निराकरण भाडेकऱ्यांस करता न आल्यास लॉकर भाड्याने देणे नाकारले जाईल अगर लॉकर पुर्वीच भाड्याने दिलेले असल्यास भाडे परत न करता बँक लॉकर रिकामे करून घेऊ शकेल.

9) लॉकरची किल्ली हरवल्यास अगर दुसऱ्यांचे हाती पडल्यास किंवा अन्य कारणाने गहाळ झाल्यास होणाऱ्या नुकसानीबदल भाडेकरी स्व:च जबाबदार राहील भाडेकऱ्यास दिलेली किल्ली त्यांचेकडुन कोणत्याही कारणाने नाहीशी झाल्यास भाडेकऱ्याने तशी लेखी माहिती बँकेस दिली पाहिजे. किल्ली गहाळ झाल्यास लॉकरचे कुलूप बदलण्याचा सर्व खर्च भाडेकऱ्यास सोसावा लागेल. असा खर्च भाडेकऱ्याने सेफ उघडण्यापुर्वी बँकेत डिपॉझीट म्हणुन भरली पाहिजे.

10) लॉकर व त्याची किल्ली यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्यास तशी दुरूस्ती बँकेने नेमलेल्या कारागीराकडुन करून घेतली जाईल व त्याची खर्च नियम क्रमांक 9 प्रमाणे भाडेकऱ्यास द्यावा लागेल.

11) लॉकर भाड्याने घेण्याचा करार / व्यवहार भाडेकऱ्याने स्वत:च केला पाहिजे. भाडेकऱ्यांचे वतीने तो कोणासही करता यावयाचा नाही. रजीस्टर्ड संस्थांच्या बाबतीत मात्र लॉकर भाड्याने घेण्याचा करार / व्यवहार अशा संस्थांनी त्यासाठी मुद्दाम योग्य रितीने अधिकृत केलेल्या अशा एका अगर जास्त इसमासच सदर संस्थेतर्फे करता येईल. अशा वेळी अशा अधिकृत इसमाने त्यास त्यांच्या संस्थेचे दिलेले अधिकारपत्र बँकेकडे लॉकर भाड्याने घेण्यापुर्वी दाखल केले पाहिजे. अशा इसमाचा सदर अधिकृत काढून तो संस्थेचे दुसऱ्यास दिल्यास व तशी लेखी सुचना बँकेकडे ताबडतोब न दिल्यास त्यामुळे संस्थेचे काही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी त्या संस्थेवर राहिल, बँकेवर असणार नाही.

12) लॉकर भाड्याने घेतल्यानंतर भाडेकरी मयत झाल्यास त्याने मृत्यूपुर्वी ज्या इसमास लेखी अधिकार दिल्याचे बँकेच्या दप्तरी नमुद असेल अशाच अधिकृत इसमास मयताचे पश्चात लॉकर उघडण्याचा अधिकार राहील. असा अधिकार देण्यात आला नसेल किंवा अधिकृत इसमही मयत झाला असेल व त्यांच्या ऐवजी दुसरा इसम नेमून बँकेस कळविण्यात आलेले नसेल तर भाडेकऱ्यांचे वारस जे कोणी आपला हक्क कोर्टात प्रस्थापित करतील अशा एका अगर अधिक इसमास लॉकर उघडण्याचा अधिकार आहे असे बँक समजेल. मात्र अशा इसमाने अगर इसमांनी सदर लॉकरबदल बँकेस देणे असलेले भाडे व इतर सर्व लॉकर उघडण्यापुर्वी बँकेत भरले पाहिजे. त्याचप्रमाणे भाडेकरी मयत झाल्याचा दाखलाही अधिकृत इसमाने लॉकर उघडण्यापुर्वी बँकेकडे हजर केला पाहिजे.

13) लॉकर भाड्याने देण्यासंबंधीचा जो करार भाडेकऱ्याने बँकेस करून द्यावयाचा तो प्रथमत : एका विशिष्ट मुदती करीता असेल. सदर मुदत भरताच लॉकर रिकामा करता येईल अशी आगाऊ सुचना

HEAD OFFICE

भाडेकऱ्यांकडुन बँकेस मिळाली नसेल व पुढे मुदत वाढविण्यास बँकेची हरकत नसेल तर भाडेपट्टातील मुदती एवढ्याच नव्या मुदतीने ती लॉकर त्याने बँकेकडून पुन्हा भाड्याने घेतला असे समजले जाईल. मात्र भाडेकऱ्यांची करारात नुमद असलेल्या अगर वेळोवेळी वाढलेल्या मुदतीनंतर पुढे लॉकर भाड्याने ठेवण्याची इच्छा नसल्यास मुदत संपण्यापुर्वी निदान सात दिवस अगोदर तशी नोटीस त्याने बँकेस दिली पाहिजे.

14) कराराच्या मुदतीनंतर लॉकर नको असल्यास त्याप्रमाणे वरील कलम क्र. 13 अन्वये द्यावी लागणारी नोटीस भाडेकऱ्याने न दिल्यास व मुदतीत लॉकर रिकामा करून न दिल्यास करारात नमुद असलेल्या पुढिल मुदती इतक्या दिवसांचे भाडे भाडेकऱ्यांकडुन वसुल करून घेण्याचा हक्क बँकेस राहील. ते माझे खातेत नावे टाकणेस हरकत घेणार नाही.

15) येणे रक्कम भाडेकऱ्याने न दिल्यास अगर कराराच्या शर्ती व इतर नियम न पाळल्यास त्यांचा लॉकर वापरण्याचा हक्क बंद करण्याचा व त्यांचेविरूध्द जरूर ते कायदेशीर इलाज करण्याचा बँकेस अधिकार आहे.

16) भाडे कराराचे मुदतीच्या किंवा वाढविलेल्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी भाडेकऱ्याने आपले लॉकर मोकळे करून दिले पाहिजे त्याने तसे न केल्यास अगर न झाल्यास किंवा सेफ डिपॉझीट लॉकरच्या नियमान्वये त्यांचेकडून कोणतेही नुकसान झाल्यास अगर भाडे येणे राहिल्यास व त्याने ते भाडे व नुकसान न दिल्यास त्यांचेकडुन लॉकर मोकळे करून घेण्याकरिता, नुकसान व करारातील मुदती इतक्या पुढिल मुदतीबदल येणे राहिलेली रक्कम व इतर सर्व खर्च व अनुषांगिक येणी वसुल करून घेण्याकरीता बँक अशा माणसांवर लवाद अगर अन्य तऱ्हेची कायदेशीर इलाज करू शकेल मात्र अशा प्रकारच्या कायदेशीर इलाज करणे बँकेचे संचालक मंडळाचे मर्जीवर राहील.

17) भाड्याची मागणी केली गेली असो अगर नसो. भाडेकऱ्याने भाडे वेळेवर दिले नाही तर अगर कराराच्या कोणत्याही अटीचा भंग केला तर अशा परिस्थितीत भाडेकऱ्यांविरूध्द बँकेस जे कोणते इतर हक्क प्राप्त झाले असतील, त्यास कोणत्याही प्रकारे बाध न येता, बँकेस वाटल्यास भाडेकऱ्यांचे लॉकर वापरण्याचे सर्व हक्क बँकेस रद्द करता येतील.

भाडेकऱ्याने थकलेले भाडे द्यावे अगर कराराच्या अटीपैकी एखाद्या अटीची अंमलबजावणी करावी अशी नोटीस भाडेकऱ्यास दिल्यानंतर, भाडेकऱ्याकडुन भाडे देण्यात अगर नियम (अट) पाळण्यात निष्काळजीपणा झाल्यास बँकेस लॉकर उघडण्याची मुभा राहील. नंतर बँकेस वाटल्यास भाडेकऱ्यांच्या जोखमीवर व त्यांचे खर्चाने इंशुअर्ड पार्सलने अगर अन्य इष्टप्रकारे लॉकरमधील ऐवज भाडेकऱ्याने भाडे करारनाम्यामध्ये लिहून दिलेल्या अगर त्यानंतर लेखी कळविलेल्या पत्यावर बँक पाठवून देईल.किंवा बँकेस वाटल्यास सदर ऐवज बँकेस इष्ट वाटेल अशा दुसऱ्या कोणत्याही लॉकरमध्ये अगर अन्य ठिकाणी बँक ठेवुन देईल. मात्र अशा परिस्थितीमध्ये भाडेकऱ्यास पुर्वी ठरविलेल्या वार्षिक भाड्याच्या दुप्पट भाडे द्यावे लागेल. त्याचप्रमाणे लॉकर उघडण्याबद्दल व दुरूस्त करण्याबदलचा आणि कुलूप बसविण्याचा खर्च भाडेकऱ्यास द्यावा लागेल.

18) बँकेकडे नमुद असलेल्या पत्त्यावर बँकेने लेखी नोटिस पोस्टाने अगर अन्य मार्गाने पाठविली म्हणजे ती भाडेकऱ्यावर अगर त्याचे अधिकृत इसमांवर अगर त्याचे वारसावर योग्य प्रकारे लागु झाली असे समजले जाईल. अशाच तऱ्हेने त्याचे जिन्नस अगर शिलकी रक्कम पाठविली जाईल. अशा तऱ्हेने पाठविलेल्या जिनसा अगर शिलकांची पोहोच भाडेकऱ्यास न झाल्यास त्याची जबाबदारी बँकेवर राहणार नाही. त्याचप्रमाणे या जिनसा बँकेकडे परत आल्यास अगर त्या पाठविणे काही कारणाने

HEAD OFFICE

बँकेस शक्य न झाल्यास पडुन राहिल्यामुळे त्याची खराबी झाल्यास त्याबाबतची जबाबदारी व जोखीम बँकेवर कोणत्याही प्रकारे राहणार नाही.

19) भाडेकऱ्याने आपला पत्ता बदलल्यास तसे बँकेस लेखी कळविले पाहिजे. अशा तऱ्हेने कळविले नसल्यास बँकेत असलेल्या पहिल्या पत्यावर पाठविलेल्या नोटिसा व इतर व्यवहार अगर मालमत्ता रितसर पाठविली आहे असेच समजले जाईल व त्या न पोहोचल्याची जबाबदारी बँकेवर राहणार नाही.

20) लॉकर धारकास लॉकर्स उघडण्यास प्रतिबंध खालील बाबी असल्यास करण्यात येईल.

अ) जर लॉकर धारकाचे लॉकर भाडे थकीत असेल तर

ब) जर ग्राहकाने ओळखीचा पुरावा (Proof of identity) बँकेने मागितला व ग्राहक सदर पुरावा सादर करू शकला नाही अशा वेळी बँक लॉकर उघडण्यास प्रतिबंध करेल.

21) लॉकर धारकाने (ग्राहकाने) कराराचा भंग केला किंवा ग्राहक बँकेने सांगितलेल्या बाबीची पुर्तता करत नसेल अशा वेळी बँके मार्फत कमी - कमी 3 महिने आधी या संदर्भातील (लॉकर खाली करणे बाबत) नोटिस रजिस्टर / स्पीड पोस्ट, ईमेलव्दारे, बँकेच्या दप्तरी असलेल्या मोबाईल नंबर वर एसएमएसव्दारे, व्हाट्सअपवर करार संपुष्ठात आल्याबाबत ( टर्मिनेशन) नोटिस पाठविली जाईल.

22) सदर नोटिस मिळाल्या नंतर मुदतीत व वेळेत लॉकर रिकामे करून लॉकरची चावी, पासवर्ड इतर काही बाबी बँकेने लॉकर उघडतेवेळी दिलेले असल्यास त्या बँकेस परत केल्या पाहिजे.

23) बँकेस करारनाम्यातील तरतुदीनुसार, बँकेच्या अंतर्गत पॉलिसी व कायदे प्रक्रिया व्दारे लॉकर ब्रेक ओपन करण्याचा अधिकार असेल जर

अ) करार संपुष्ठात आणण्याची नोटिस (टर्मिनेशन) नोटिस. वरील 22 नंबर अन्वये लॉकर धारकाने लॉकर वेळेत व मुदतीत रिकामे करून दिले नाही.

ब) लॉकर भाडे मागिल 3 वर्षाचे येणे बाकी असेल.

क) लॉकर ऑपरेट केले गेले नसेल (जरी भाडे असेल किंवा नसेल तरी ) 7 वर्षा पर्यत किंवा लॉकर धारकाचा तपास लागत नसेल तर.

24) बँक लॉकर ब्रेक ओपन करण्यापुर्वी बँके मार्फत सर्व प्रकारचे प्रयत्न करून ग्राहकाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करेन. ईमेलव्दारे, बँकेच्या दप्तरी असलेल्या मोबाईल नंबर वर एसएमएसव्दारे, व्हाट्सअपवर, स्पीड पोस्ट, रजीस्टर ईडी इत्यादी

25) बँकेने पाठवलेली करार संपुष्ठात येणे संदर्भातील व लॉकर ब्रेक ओपन करणे संदर्भातील नोटिस पाठविलेल्या पत्यावरून (रिटर्न) परत आली अशा वेळी कमीत कमी 3 महिने आधी लॉकर ब्रेक करण्याचा हेतु काय आहे या संदर्भात कमीत कमी 2 वर्तमानपत्रात ( 1 इंग्रजी व 1 स्थानिक भाषेतील ) जेथे लॉकर धारक राहत असेल तेथील वर्तमान पत्रात प्रसिध्द केली जाईल.

26) सदर लॉकर ब्रेक ओपन करतांना समिती सदस्य ज्यात 2 बँक ऑफिसर, 2 स्वंतत्र व्यक्ती (खातेदार) साक्षीदार म्हणुन उपस्थित असतील व संपुर्ण कारवाई (पंचनामा), तसेच यासंदर्भात याचे व्हिडिओ रेकॉर्डिग करेल व सर्व रेकॉर्ड जतन केले जाईल.

27)वरील प्रमाणे बँक पध्दतीचा अवलंब करेल व लॉकर मधील वस्तुची यादी करण्यात येईल. बँकेच्या अॅप्रुव्हड व्हॅल्युअर मार्फत त्याचे व्हॅल्युअशन केले जाईल व सर्व वस्तु बंद लिफाफ्यात यादीसह आग प्रतिबंध व सदर लिफाफ्यास छेडछाड होणार नाही अशा पध्दतीने ठेवेन.

28) बँक खालील बाबतीत उत्तर दायित्वपासुन (जबाबदारी) मुक्त असेल

HEAD OFFICE

अ) पाऊस, आग, भुंकप, विज कोसळणे, नागरी अशांतता, दंगे, युध्द, आतंगवादी हल्ला किंवा यासारखे दुसऱ्या कारणाने

ब) ग्राहकाच्या चुकीमुळे, दुर्लक्षामुळे जर काही नुकसान झाल्यास

क) बँक लॉकर मध्ये ठेवण्यात येणाऱ्या वस्तुची माहिती ठेवणार नाही व त्यांचा विमा उतरविणार नाही

29) सदर बाबतीत वाद उदभवल्यास बँक जेथे मुख्य कार्यालय असेल तेथील न्यायालयाचे अधिकार क्षेत्र तंटा निवरनाचे अस

30) 7 वर्ष लॉकर निष्क्रिय राहिल्यास किंवा लॉकर भाडे वसुल न झाल्यास लॉकर ब्रेकअप करण्याची कार्यवाही करावी - लायसन्स / करार समाप्त.

31) उपरोक्त लॉकर ब्रेक केल्या नंतर त्यामधील सामानाचा लिलाव करून येणाऱ्या रक्कमेतुन सर्व प्रथम लॉकरभाडे, लॉकर ब्रेकअप खर्च व बँकेचे काही घेणे असल्यास ते प्रथम वसुल केले जाईल उर्वरित रक्कमेची अदायकी संबंधीत लॉकर धारकास केली जाईल.

32) कायदेशीर अधिकार क्षेत्र सदर करार भारतीय कायद्यास अधिन राहुन केला असुन ज्या ठिकाणी बँकेची शाखा व मुख्य कार्यालय असेल ते संबंधीत कार्यक्षेत्र दावा दाखल करण्यास राहील.

33) सिसिटीव्ही कॅमेरे लॉकर समोर लॉकर धारक जातांना व येताना दिसेल अशा ठिकाणी लावण्यात येईल.

34) लायसन्स समाप्ती - लॉकर धारकाने करारानुसार बँकेबरोबर सहकार्य न केल्यास व याबाबत बँकेचे समाधान झाल्यास अशा परिस्थितीत कमीत कमी 3 महिने नोटिस देऊन - इमेल, व्हॉटसअॅप, एसएमएस, कुरियर, रजिस्टर एडी इत्यादी टपालाव्दारे करार समाप्ती करता येईल.

35) नविन लॉकर धारक ग्राहकाकडुन कमीत कमी 3 महिने / वर्ष लॉकर भाडे इतकी रक्कम डिपॉझिट म्हणुन घेता येईल.

36) वरील नियमात आगाऊ सुचना न देता फेरफार करण्याचा किंवा त्यातील मजकुर कमी अधिक करण्याचा अधिकार बँकेने स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

**( दि.30.05.2025 रोजीच्या सभेमध्ये लॉकर पॉलिसी मध्ये नव्याने खालील मुद्दे समाविष्ट करण्याचे ठरविण्यात आले)**

**37) समाधानकारक लॉकर खात्यासाठी महत्वाचे मुद्दे :-** (Satisfactory Operative Account)

- **केवायसी अनुपालन :**

  लॉकर - भाड्याने घेणाऱ्याने बँकेच्या ग्राहक ड्यु डिलिजेंस (CDD) आणि तुमचा ग्राहक जाणुन घ्या (KYC) नियमांचे पुर्णपणे पालन केले पाहिजे.

- **सक्रिय बँकिंग संबंध :**

  Bank.sbi नुसार, नवीन लॉकर्ससाठी, ग्राहकांना अनेकदा विशिष्ट कालावधीसाठी (उदा. तीन वर्ष) बँक खाते असणे आवश्यक असते किंवा बँकिंग संबंध प्रस्थापित करण्यासाठी ते उघडणे आवश्यक असते.

- **नियमित ऑपरेशन :**

लॉकर - भाड्याने घेणाऱ्याने मध्यम - जोखीम असलेल्या ग्राहकांसाठी तीन वर्षातुन किमान एकदा किंवा उच्च - जोखीम असलेल्या ग्राहकांसाठी वर्षातुन एकदा लॉकर चालवणे आवश्यक आहे.

- **भाडे भरणा :**

  लॉकर - भाड्याने घेणाऱ्याने वार्षिक भाडे भरण्यासाठी सरासरी खात्यातील शिल्लक राखली पाहिजे किंवा वेळेवर भाडे भरले पाहिजे.

- **निष्क्रियता नाही :**

  लॉकर खाते एका वर्षापेक्षा जास्त काळ निष्क्रिय किंवा निष्क्रिय नसावे.

- **बँक धोरणाचे पालन :**

  ग्राहकाने रोख रक्कम, शस्त्रे, स्फोटके किंवा धोकादायक / नाशवंत साहित्य यासारख्या प्रतिबंधित वस्तु लॉकरमध्ये ठेवु नयेत.

- **योग्य परिश्रम :**

  बँकांना मध्यम - जोखीम असलेल्या ग्राहकांच्या पातळीवर योग्य तपासणी करणे आवश्यक आहे जे समाधानकारक व्यवस्थेचे प्रमुख सुचक आहे.

**सदर लॉकर नियम हे लॉकर कराराचा भाग असेल व या नियमांचा पालन करणे लॉकर धारक यानात्याने माझ्यावर / आमच्या संस्थेवर बंधनकारक आहेत.**

सुचक : श्री प्रकाश भिमपुरी गोसावी
अनुमोदक : श्री धनंजय दत्तात्रय गांगुर्डे (तेली)
ठराव सर्वानुमते मंजूर

The Pimpalgaon Merchant's Co-op. Bank Ltd. HEAD OFFICE

For The Pimpalgaon Merchant's Co-op. Bank Ltd.

Chief Executive Officer